॥ यत्र नार्यास्तु पूज्यन्ते रमते तत्र देवता: ॥

# भावना बहुउद्देशिय संस्था, नाशिक.

संस्था रजि.नं.: महा/ध.उ.आ./१४२६ नाशिक – ३०/११/२०१६ पब्लिक ट्रस्ट रजि. नं. महा/एफ १८२३ ६/७/२०१७

ऑफिस : रो–हाऊस नं. २६, श्रीकृष्ण पार्क रो–हाऊस, म्हसरुळ वरंवडी कॉर्नर, नाशिक – ४२२००४. मो.: ८९७५५४७०२२

## नाशिकरत्न भुषण पुरस्कार – २०२०

## सन्मानपत्र

सन्माननीय श्री./श्रीमती. प्रा. विजय विरभद्र कोष्टी - कवठेमहंकाळ (सांगली)

– शैक्षणिक आणि सामाजिक प्रबोधन कार्य –

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली व गोदेच्या पुण्यप्रद प्रवाहाचा परिसस्पर्श लाभलेली नाशिक नगरी प्राचिन काळापासुन प्रतिभाशाली साहित्यिक, अष्टपैलु कलावंत, प्रकांड पंडित, धुरंदर राजकारणी, कुशल क्रीडापटू, साहसी उद्योजक आणि कृतिशील विचारवंत यांच्या अखंड परंपरेने नटलेली आहे, देशाच्या या सुपुत्रांच्या असामान्य कर्तबगारीने सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय अशा विविध क्षेत्रांत भारताचा एक विशिष्ट ठसा उमटविला गेला आहे,

आपण केलेल्या बहुमोल कार्याने आपल्या देशाला सुसंस्कृत आणि समृध्द करण्यात आपण अनमोल योगदान देवून हा समाज सेवेचा वारसा चालु ठेवला आहे, त्याचा समस्त भारतवासियांना अभिमान आहे, आपले जीवन समाजोन्नतीसाठी वेचून आपण आपल्या क्षेत्राची महत्ता वाढविली आहेच, परंतु त्याचबरोबर तमाम जनतेसमोर आपल्या अप्रतिम आदर्शाचा नंदादीप अखंड तेवत ठेवला आहे, त्याच्या प्रकाशात २१ व्या शतकाच्या पदपथावरुन मार्गक्रमण करणाऱ्या वाटसरुंना सर्व समानतेचा वैभवशाली महामार्ग सापडण्यास निर्विघ्नपणे मदत होणार आहे.

आपण या देशासाठी केलेल्या महान कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख करुन नाशिकरत्न भुषण पुरस्कार – २०२० च्या रुपाने आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोत, सामाजिक सेवेच्या या कार्यात आपणांस यापुढे उदंड यश प्राप्ती होवो आणि हे सत्कार्य करण्यासाठी आपणांस मन:शांती व दीर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा व्यक्त करीत हे सन्मानपत्र आम्ही आपणांस आदरपुर्वक प्रदान करीत आहोत.

* शुभहस्ते *

| | |
|---|---|
| मा.श्री. बबनरावजी (नाना) घोलप<br>मा.समाजकल्याणमंत्री, महाराष्ट्र राज्य | मा.आ.ॲड. राहुल उत्तमराव ढिकले<br>विधानसभा सदस्य, नाशिक पूर्व |
| मंदाकिनी आर. मोरे<br>अध्यक्ष | महेश मुळे (साहित्य भुषण)<br>सेक्रेटरी |

